**MHKO070019392019**

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.२५३/२०१९ मधील नि.क्र.१ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४५१, ४५७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२)** अर्जदाराचे म्हणणे असे की, श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी चे शेती विभाग कार्यालय मौजे आगर, शिरोळचे ॲग्री ओव्हरसिअर श्री.कुलभूषण सुकूमार गाडवे यांनी प्रस्तुत मुद्देमाल मागणीचा अर्ज दाखल केला असून सदरहू जप्त मुद्देमाल म्हणजेच डेल कंपनीचा मॉनिटर, डेल कंपनीचा कि–बोर्ड व माऊस, एचपी कंपनीचा सिपीयू आणि सॅमसंग कपंनीचा टॅब (यापुढे संक्षेपाकरिता 'सदर मुद्देमाल' असा उल्लेख केला आहे.) शिरोळ पो.ठाणे गु.र.नं.३७५/२०१९ भा.द.वि.स.कलम ४५४,४५७,३८० या गुन्हयाचे कामी पोलिसांनी जप्त केलेला आहे व तो श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी यांच्या मालकीचा आहे. सदरचा जप्त मुद्देमाल हा श्री गुरुदत्त शुगर्स लि. या साखर कारखान्याच्या मौजे आगर, शिरोळ येथील असलेल्या कार्यालयामधून चोरीला गेलेला आहे. अर्जदार यांना सदर मुद्देमाल हा त्यांचे दैनंदिन कामासाठी म्हणजेच ऊस नोंद घेणे, पावत्या देणे इ महत्वाच्या कामासाठी सदर साहित्य अत्यंत गरजेचा असून तो पोलिसांचे ताबेत असलेने त्यांना ऊस नोंदीबाबतच्या पूर्तता करण्यासाठी कामी गैरसाये होत आहे. तसेच सदर जप्त मुद्देमाल हा पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास विनावापरुन गंजुन जाऊन खराब होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत अर्जदार यांनी प्रस्तुत गुन्हयाची फिर्याद दिलेली आहे. त्यामुळे सदर वाहन अटी व शर्ती घालुन सुपुर्दनाम्यावर अर्जदारास परत करणेची विनंती केलेली आहे.

**०३)** तपासी अंमलदाराचे म्हणणे (नि.क्र.४) पाहिले व वाचले. त्यांनी सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल डेल कंपनीचा मॉनिटर १८ इंची, डेल कंपनीचा कि–बोर्ड व माऊस, एच.पी.कंपनीचा सिपीयू, सॅमसंग कंपनीचा टॅब असे जुने वापरते यांचा अर्जदार यांना योग्य त्या अटीं व शर्तीवर परत देणेस हरकत नाही असे म्हणणे दिले आहे. मा.

सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मुद्देमाल हा पुराव्यासाठी महत्वाचा असून सदर मुद्देमाल अर्जदारास परत केल्यास त्यांची अर्जदारा कडून विक्री किंवा गहाळ होण्याची शक्यता आहे. तरी अर्जदाराचा मुद्देमाल मागणीचा अर्ज नामंजूर करावा असे म्हणणे सादर केले.

**०४)** अर्जदार यांनी श्री गुरुदत्त शुगर लि. यांचेकडील दि.१८/९/१९ रोजीचा ठराव क्रं.६ ची प्रत ही नि.३/१ कडे, तसेच अर्जदार साखर कारखाना यांनी इलेक्ट्रोटेक एंटरप्राईजेस यांचेकडून खरेदी केलेले मॉनिटर, कि-बोर्ड, माऊस व सिपीयू ची टॅक्स इन्व्हाईसची झेरॉक्स पावती (नि.क्र.३/२) वर, तसेच काजवे मोबाईल शॉपी मधून सॅमसंग टॅब टी-११६ ची खरेदीची झेरॉक्स पावती (नि.क्र.३/३) वर, तर अर्जदार यांचा ओळखपत्राची प्रत ही (नि.क्र.३/४) कडे दाखल केलेली आहे. त्यामुळे नमुद दाखल कागदपत्रावरुन श्री गुरुदत्त शुगर्स लि. यांचे करीता अर्जदार हेच जप्त मुद्देमालाचे मालक असल्याचे दिसून येते.

**०५)** सदर जप्त मुद्देमाल अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणीही मागणी केलेली नाही आणि अर्जदार यांनी त्यांचा प्रथमदर्शनी मालकी हक्क दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत गुन्हयाची फिर्याद ही अर्जदार यांनीच दिलेली आहे. तसेच जप्ती पुर्वी मुद्देमाल हा त्यांच्या कायदेशीर कब्जामध्ये असल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत खटला चालण्यास बराच वेळ लागण्याची शक्यता आहे. सदरचा मुद्देमाल हे पोलीस ठाण्यामध्ये पडुन राहिल्यास वापर न केल्यामुळे ते खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदार सदर जप्त मुद्देमालाचे मालक असल्याने व ते त्यांच्या वापरातील असल्याने सदरहू मुद्देमालाचा ताबा आवश्यक त्या अटी घालुन त्यांना देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. सबब वर नमूद कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) पोलीस निरीक्षक, शिरोळ पोलीस ठाणे यांना निर्देशीत करण्यात येते की, शिरोळ पोलीस ठाणे गु.र.क्र.३७५/२०१९ (भा.दं.सं.कलम ४५४,४५७,३८०) मधील जप्त मुद्देमाल डेल कंपनीचा मॉनिटर १८ इंची, डेल कंपनीचा कि-बोर्ड व माऊस, एच.पी.कंपनीचा सिपीयू, सॅमसंग कंपनीचा टॅब याचा अंतरीम ताबा अर्जदार श्री गुरुदत्त शुगर्स लि.

टाकळीवाडी चे शेती विभाग कार्यालय मौजे आगर, शिरोळ चे ॲग्री ओव्हरसिअर श्री.कुलभूषण सुकूमार गाडवे, वय.३१, रा.शाहुनगर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांना रु.४०,०००/– (रक्कम रुपये चाळीस हजार फक्त) चे सुपुर्तनाम्यावर पुढील अटीवर देण्यात यावाः–

**अ)** अर्जदाराने सदर जप्त मुद्देमालाचे स्वरुप बदलण्याचे नाही अगर विक्री करण्याचे नाही.

**ब)** अर्जदाराने सदर जप्त मुद्देमालचे शिरोळ पोलीस ठाणे गु.र.क्र. ३७५/२०१९ (भा.दं.सं.कलम ४५४,४५७,३८०) चे कामी न्यायालयाचे आदेशानुसार हजर करण्याचे आहे.

२) सदरील जप्त मुद्देमाल अर्जदारास देताना त्याचा सविस्तर पंचनामा करण्याचा आहे आणि सदर सुपुर्दनामा व पंचनामा दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करण्याचा आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2019.10.23 01:08:54 +0530

दि.१९/१०/२०१९. (विश्वास पां. शिंदे)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जयसिंगपूर.